## L. C. BILL No. I OF 2024.

*A BILL*

TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२४ चे विधान परिषद विधेयक क्रमांक १.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०२४ चा महा. ८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

२०२४ चा महा. ८.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ यांच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ६ मधील, पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

“ परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, अनुसूचीच्या भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेली विद्यापीठे, त्या दिनांकास स्थापन करण्यात आली असल्याचे मानण्यात येतील.”.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमधील, भाग दोन मधील, नोंद २ नंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| “३. संजीवनी विद्यापीठ, कोपरगाव, मुख्यालय, संजीवनी विद्यापीठ, कोपरगाव, गट क्रमांक २४ व २५, कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर –४२३ ६०१. | संजीवनी ग्रामीण शिक्षण सोसायटी, कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर –४२३ ६०१. |
| ४. डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे, मुख्यालय डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे, संत तुकाराम नगर, पिंपरी-चिंचवड, सर्व्हे क्रमांक १८०/२/१ व १८०/२/२, तालुका हवेली, पुणे –४११ ०१८ आणि तसेच ताथवडे, पुणे, सर्व्हे क्रमांक ८७/१, ८८, १३८/१अ, १३८/१ब, १३८/२ब व ६२/४/३. | डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, फ्लॅट क्रमांक १०१, श्री. मोतीसागर अपार्टमेंट, सर्व्हे क्रमांक ४७३ ए, जी. जी. ठक्कर रोड, पुणे –४११ ००१.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) यामध्ये, महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्याची तरतूद केली आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद केली आहे की, शासन, कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने कलम ५ मधील तरतुदींचे अनुपालन केले आहे याबाबत खात्री पटली असेल तर, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोनमध्ये समाविष्ट करून, खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देईल.

**३.** कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, अनुक्रमे, “ संजीवनी विद्यापीठ, कोपरगाव ” आणि “ डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे ” या नावांनी खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यासाठी, संजीवनी ग्रामीण शिक्षण सोसायटी, कोपरगाव, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर –४२३ ६०१ आणि डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, फ्लॅट क्रमांक १०१, श्री. मोतीसागर अपार्टमेंट, सर्व्हे क्रमांक ४७३ ए, जी. जी. ठक्कर रोड, पुणे –४११ ००१ या प्रायोजक मंडळांनी कलम ५ मधील तरतुदींचे अनुपालन केले आहे.

**४.** म्हणून, कायदा अधिनियमित करून त्याद्वारे, प्रस्तावित केलेल्या उक्त खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्यास परवानगी देण्यासाठी आणि त्यामध्ये, संजीवनी विद्यापीठ, कोपरगाव आणि डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे आणि त्यांची प्रायोजक मंडळे यांची नावे, ठिकाणे व मुख्यालये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**सन २०२४ चे वि. प. विधेयक क्रमांक १—महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट.**

**[महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यातील उतारे]**

**(सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८)**

**१** ते **५**. ** ** ** **

**६.** (१) शासन, कलम ५च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेतल्यानंतर, प्रायोजक मंडळाने कलम ५ मधील तरतुदींचे अनुपालन केले आहे, याबाबत खात्री पटली असेल तर, खाजगी विद्यापीठाचे व त्याच्या प्रायोजक मंडळाचे नाव, ठिकाण व मुख्यालय, राज्य विधानमंडळाद्वारे कायदा अधिनियमित करून, केलेल्या सुधारणेद्वारे अनुसूचीच्या भाग दोनमध्ये समाविष्ट करून, खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देईल. विद्यापीठाची स्थापना व विधिसंस्थापन.

(२) ते (७). ** ** ** **

**७** ते **५९**. ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.]**

**[महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई